# साधू-संतांचे महत्त्व आणि कार्य

## अनुक्रमणिका


- मनोगत ९
- संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन ११

**प्रकरण १ : खरे साधू-संत** १२

१. व्याख्या २. महत्त्व १२

३. साधू-संत आणि तीर्थक्षेत्र १५

४. ढोंगी साधूंचे पितळ उघडे पाडणारे खरे संत १६

५. भावी हिंदु राष्ट्रात खऱ्या संतांनाच स्वतःला 'साधू', 'महाराज','स्वामी' इत्यादी म्हणवून घेण्याचा अधिकार असेल ! १७

**प्रकरण २ : संतांची योग्यता न जाणणारे बुद्धीप्रामाण्यवादी, पोलीस, प्रसारमाध्यमे आणि राजकीय पक्ष** १९

१. बुद्धीप्रामाण्यवादी (अंधश्रद्धा निर्मूलन कायदा आणि संत) १९

२. संतांवर अत्याचार करणारे पोलीस २४

३. संतांचा अपप्रचार करणारी प्रसारमाध्यमे २६

४. राजकीय पक्ष आणि संत ३०

**प्रकरण ३ : हिंदूंची दुःस्थिती आणि ती सुधारण्याचे उपाय** ३८

१. भगत व महाराज यांच्याकडे विविध समस्यांसाठी जाणाऱ्यांची संख्या वाढत असण्यामागील कारणाचा घेतलेला वैज्ञानिक शोध ३८

२. रामकृष्ण मिशनच्या वतीने देणगीसाठी वर्तमानपत्रात दिलेल्या विज्ञापनात श्री रामकृष्ण परमहंस हे धर्मनिरपेक्ष संत असल्याचा उल्लेख ! ३९

३. हिंदूंची दुःस्थिती आणि बलाढ्य हिंदुत्ववादी संघटनांची निष्क्रियता ४०

४. हिंदूंची दुःस्थिती सुधारण्यासाठीचे उपाय व संतांकडून अपेक्षित कार्य ४२

**प्रकरण ४ : संत करत असलेले राष्ट्र व धर्म यांच्या संदर्भातील कार्य** ४५

१. सर्वसाधारण माहिती ४५

२. योगगुरु रामदेवबाबा यांचे कार्य ५१

३. पूज्यपाद संत श्री आसारामजी बापू यांचे कार्य ५२

४. मुसलमानांच्या संदर्भातील कार्य ५३

५. संत करत असलेले अनमोल कार्य ६२

**प्रकरण ५ : विविध विषयांवर संतांचे मार्गदर्शन** ६३

| | | |
|---|---|---|
| १. हिंदूंची स्थिती | २. मनुष्य | ६३ |
| ३. मंदिरे | ४. गोहत्या | ६६ |
| ५. राष्ट्र आणि धर्म यांची स्थिती | | ६७ |
| ६. राष्ट्र व धर्म यांच्या स्थितीवर उपाय | ७. स्वसंरक्षण प्रशिक्षण | ६७ |
| ८. धर्माचार्य आणि संत यांची स्थिती | | ६८ |
| **प्रकरण ६ : संत आणि सनातन संस्था** | | ६९ |
| १. सनातनचे संत आणि त्यांची वैशिष्ट्ये | | ६९ |
| २. इतर संप्रदाय आणि सनातन संस्था | | ७२ |
| ३. सनातन संस्थेच्या कार्याचे संतांनी केलेले कौतुक | | ७३ |
| ४. संत सनातनला करत असलेले साहाय्य | | ७७ |
| **प्रकरण ७ : हिंदूंनो, संतांसंदर्भात आपले कर्तव्य बजावा !** | | ८३ |


# मनोगत

'साधु दिसती वेगळाले । परी ते स्वस्वरूपीं मिळाले ।।' म्हणजे 'संत बाह्यतः वेगवेगळे दिसत असले, तरी ते आतून परमेश्वराशी एकरूप झालेले असतात', असे दासबोधात (दशक ७, समास २, ओवी ३१) लिहिले आहे. निराकार असलेल्या भगवंताकडे जाण्यासाठी त्याचे साकार रूप असलेले संतच मार्गदर्शन करू शकतात. 'स तरति स तरति स लोकांस्तारयति ।' (नारदभक्तिसूत्रे, अध्याय ३, सूत्र १७) म्हणजे 'संत स्वतः (भवसागरातून) तरून जातात आणि इतरांनाही तारतात.' त्यामुळेच एखाद्या तीर्थक्षेत्रापेक्षाही संतांचे माहात्म्य अधिक आहे.

सांप्रतकाळी प्रसारमाध्यमे आध्यात्मिकदृष्ट्या अधिकारी असलेल्या हिंदूंच्या साधू-संतांचे धर्म आणि संस्कृती रक्षणातील मोलाचे योगदान पूर्णपणे दुर्लक्षून समाजातील त्यांची प्रतिमा मलिन करत आहेत. त्यासाठी प्रतिदिन त्यांच्यावर खोटे आरोप करत आहेत. पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव, चांगल्या संतांवर टीका करणारे दुराचारी, प्रसिद्धीलोलुप तथाकथित साधू, हिंदुद्रोही बुद्धीवादी, संधीसाधू राज्यकर्ते आणि हिंदुद्वेष्टी प्रसारमाध्यमे सातत्याने हिंदूंची श्रद्धास्थाने डळमळीत करण्याचे कार्य करत आहेत. सर्वसामान्यांच्या श्रद्धेला धक्का बसून हिंदू धर्माचरणापासून विचलित व्हावेत आणि हिंदु धर्मापासून दूर जावेत, यांसाठी केलेला हा सारा खटाटोप आहे. त्यामुळे 'संत कोणाला म्हणायचे ?' याविषयी एकूणच हिंदु समाज संभ्रमित झाला आहे. परिणामी समाज खरे संत ओळखू शकत नाही आणि साधू-संतांकडे आदराने पाहू शकत नाही. हिंदु साधू-संतांवर खोटेनाटे आरोप करून आणि सातत्याने त्यांच्यावर गरळओक करून त्यांची प्रतिमा मलिन करणाऱ्या या प्रसारमाध्यमांची काही उदाहरणे या ग्रंथात दिली आहेत.

आतापर्यंत राजकारणी अन् त्यांच्या हातातील बाहुले असलेल्या पोलिसांनीही साधू-संतांचे महत्त्व जाणून न घेता त्यांना त्रास देण्याचेच कार्य केले आहे. प्रसिद्धीसाठी हपापलेले काही दुराचारी साधूही स्वार्थासाठी चांगल्या धर्माचार्यांना राज्यकर्ते व पोलीस यांच्या साहाय्याने लोकांसमोर गुन्हेगार ठरवण्यातपुढाकार घेत आहेत. हिंदु संतांवर अत्याचार करण्यास सदैव तत्पर असलेले तथाकथित निधर्मीवादाचे पुरस्कर्ते असलेले राज्यकर्ते, पोलीस आणि बुद्धीप्रामाण्यवादी यांचे खरे स्वरूप आपल्याला या ग्रंथात पहायला मिळते.

साधू-संतांचे समाजमनावर बिंबवले जाणारे विकृत चित्रण आणि हिंदूंमधील धर्माभिमानाचा अभाव यांमुळे खऱ्या साधू-संतांपासून सर्वसामान्य हिंदू दूर जात आहेत. उचित मार्गदर्शनाच्या अभावी त्यांची स्थिती भरकटल्यासारखी झाली आहे. असे भरकटलेले दिशाहीन हिंदू आणि हिंदुत्ववादी संघटना यांची स्थिती या ग्रंथात विशद केली आहे. सद्यस्थितीत निराधार हिंदूंना योग्य मार्गदर्शन करणे आणि त्यांच्याकडून साधना करवून घेणे, हेच साधू-संतांकडून अपेक्षित आहे. हिंदू आणि हिंदुत्ववादी संघटना यांच्या दुःस्थितीवरील खरा उपाय, तसेच जगदोद्धारासाठी जीवन वेचणाऱ्या साधू-संतांच्या अनमोल मार्गदर्शनातील काही महत्त्वाची सूत्रे या ग्रंथात सांगितली आहेत.

राष्ट्र आणि धर्म यांची स्थिती बिकट असल्याने ती सुधारण्यासाठी अनेक साधू-संत सध्या कार्यरत आहेत. त्यापैकी काहींची माहिती या ग्रंथातून मिळते. तसेच राष्ट्र आणि धर्म यांचे कार्य करणारी सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांविषयी संतांनी काढलेले गौरवोद्‌गारही या ग्रंथात दिले आहेत.

धर्माधिष्ठित आणि सुसंस्कृत समाज घडवणारे अन् ईश्वरी चैतन्याचा स्रोत लोकांपर्यंत पोहोचवून त्यांना सांसारिक अडथळ्यातून भवसागर पार करून नेणारे साधू-संत ईश्वराची सगुण रूपेच आहेत. दीपस्तंभाप्रमाणे हिंदूंना मार्गदर्शन करून त्यांचे ऐहिक आणि आध्यात्मिक जीवन सुकर करून आनंदप्राप्ती मिळवून देणाऱ्या हिंदु धर्मातील या अत्यंत आदरणीय आणि गौरवास्पद विभूती आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवाच आहेत. कीर्ती, पैशाची हाव, मठबाजी आणि ढोंगबाजी नावालाही नसलेले; प्रीती आणि भक्ती यांचा अपूर्व संगम असलेले, सदैव लोकांचे कल्याण आणि समाजहित यांची चिंता वहाणारे साधू-संत आजही या भूतलावर अस्तित्वात आहेत. केवळ त्यांना ओळखण्याची दृष्टी हवी. ही दृष्टी साधनेनेच निर्माण होऊ शकते.

'हा ग्रंथ वाचून हिंदूंना खऱ्या साधू-संतांना ओळखण्याची दृष्टी प्राप्त होवो. ते करत असलेल्या कार्याची महती सर्वांना कळो आणि हिंदूंना त्यांचा आशीर्वाद अन् मार्गदर्शन प्राप्त होऊन त्यांच्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक होवो, म्हणजेच त्यांची आध्यात्मिक उन्नती होवो', अशी ईश्वरचरणी प्रार्थना ! - **संकलक**